विशेष पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा

दिनांक :- 20/01/2026



जिल्ह्यातील हरविलेल्या बालकांच्या शोधासाठी "ऑपरेशन मुस्कान".

मा. अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंधक विभाग मुंबई यांचे निर्देशांप्रमाणे मा. पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांचे नेतृत्वात बुलढाणा जिल्ह्यामध्ये **दि.20/01/2026 पासून ते दि.20/02/2026 या कालावधीत जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीमध्ये हरविलेल्या बालकांच्या शोधासाठी "ऑपरेशन मुस्कान-14" शोध मोहीम** राबविण्यात येत आहे. सदर शोध मोहिमेमध्ये जिल्ह्याच्या अभिलेखावर मिसींग (हरविलेले) बालकांचा प्रभारी अधिकारी यांचे नेतृत्वात पो.स्टे. स्तरावर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली उपविभाग स्तरावर एक मिसींग सेल स्थापन करुन हरविलेल्या शोध घेण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील आश्रम गृह, अशासकीय संस्था, रेल्वे स्थानके, बसस्थानके, रस्त्यावर भिक मागणारी मुले अथवा कचरा गोळा करणारी मुले, धार्मीक स्थळे, रुग्णालये, हॉटेल्स, दुकाने इत्यादी ठिकाणी काम करणारी मुलांना हरविलेली मुले समजून, त्यांची माहिती घेऊन, सदर मुले मानवी तस्करीचे बळी तर नाही या संबंधाने कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्ह्याच्या अभिलेखावर हरविलेल्या बालकांची माहिती काढून,सदर बालकांचा शोध घेण्यात येत आहे. सदर मोहिमेमध्ये बालकांसाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्था, बालगृह, बाल कल्याण समिती, बाल सुरक्षा कक्ष यांची मदत घेण्यात येत आहे. सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारची बालके आढळून आल्यास नियंत्रण कक्ष बुलढाणा येथील **दुरध्वनी क्र**. (07262) 242400 किंवा **डायल-112** यावर माहिती द्यावी.

मा.श्री. निलेश तांबे- पोलीस अधीक्षक बुलढाणा यांचे नेतृत्वात तसेच **श्री. श्रेणिक लोढा अपर पोलीस अधीक्षक खामगांव, श्री. अमोल गायकवाड-अपर पोलीस अधीक्षक बुलढाणा, श्री. सुधीर पाटील उपविपोअ. बुलढाणा, श्री. प्रदिप पाटील उपविपोअ. खामगांव, श्री. आनंद महाजन उपविपोअ. मलकापूर, श्रीमती मनिषा कदम उपविपोअ. देऊळगांव राजा, श्री. संतोष खाडे उपविपोअ. मेहकर, पोनि. श्री. सुनिल अंबुलकर स्था.गु.शा. बुलढाणा यांचे मार्गदर्शनाखाली** मपोउपनि. प्रिया उमाळे, पोउपनि. संजय ठाकरे सर्व प्रभारी अधिकारी बुलढाणा जिल्हा, मिसींग सेल अधिकारी व अंमलदार, अमानवीय वाहतुक प्रतिबंधक कक्ष-बुलढाणा यांचे कडून ऑपरेशन मुस्कान-14 यशस्वीतेसाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.पोलीस अधीक्षक बुलढाणा, यांचे करीता.

प्रति, सर्व पत्रकार बांधव यांना सस्नेह अग्रेषीत.